# नववर्षात राजकीय भूकंप

## संपादकीय

### जयश्री खाडिलकर-पांडे कृत

२०१८ या नवीन वर्षाचे स्वागत करीत असताना यावर्षी भारतात होणाऱ्या राजकीय भूकंपांची जाण ठेवण्यासाठी आपण सज्ज होऊया. २०१८ साली कर्नाटक, राजस्थान, मध्य प्रदेश, मिझोराम, नागालँड, त्रिपुरा, छत्तीसगढ आणि मेघालय या आठ राज्यांत विधानसभा निवडणुका आहेत. त्यानंतर २०१९ साली लोकसभा निवडणुका आणि त्यापाठोपाठ महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका आहेत. यामुळे हे नववर्ष पूर्णपणे राजकीय वर्ष ठरणार आहे. निवडणुकांच्या भरगच्च वेळापत्रकामुळे देशात निश्चितपणे राजकीय भूकंप होतील. आरोप, प्रत्यारोप, खटले, निर्णय, निदर्शने, विरोध याचा काहूर माजेल. सत्ता आणि त्यातून येणारी संपत्ती यासाठी सर्वच पक्ष नीचतम पातळी गाठतील. अशा वेळी राजकीय भान राखत, खऱ्याखोट्याची ओळख करून घेत योग्य उमेदवार निवडीची फार मोठी जबाबदारी जनतेवर आहे. या काळात जर जनता फसली तर पुढील काळ आपल्यालाच खडतर जाणार आहे हे जाणून जनतेने राजकारणाबाबत जागरूक राहणे आवश्यक आहे. आम्हाला राजकारणात रस नाही असे अनेकजण म्हणतात. पण ज्या राजकारणाचा आपल्या रोजच्या जीवनावर थेट परिणाम होतो त्यापासून दूर राहणे शहाणपणाचे ठरणार नाही.

गुजरात निवडणूक येणार म्हटल्यावर जीएसटीचे दर कमी झाले, गुजरात आणि उत्तर प्रदेशच्या निवडणुका संपताच 'पद्मावती' चित्रपटावरील बंदी उठणार अशा बातम्या येऊ लागल्या, कर्नाटकची निवडणूक आली आणि कन्नड भाषा, सीमा प्रश्न आणि पाणी वाटपासाठी आंदोलने सुरू झाली. ज्या उत्तरपूर्व राज्यात गोमांसाचे सर्रास सेवन करतात त्या राज्यांच्या निवडणुका नजदीक आल्या आणि गोवंश हत्याबंदीचे नियम शिथिल केले जाणार या बातम्या धडकू लागल्या, छत्तीसगढ या नक्षली राज्यांत एकदम नक्षलावाद्यांना कंठस्नान घालण्याची जोरदार मोहीम सुरू झाली. राममंदिर आणि तीन तलाक या विषयांनी उचल खाल्ली, राजस्थान सरकारनी गुजरांना एक टक्का आरक्षण देऊन टाकले. अगदी अलीकडे पुरस्कार वापसीचे लोण आले होते ते निवडणुका संपताच एकदम बंद झाले. कदाचित नवीन वर्षात हा प्रकार पुन्हा सुरू होईल. दलित आणि दलितेतर वादाचा भडका उडवला जाईल. सत्ताधारी आणि विरोधक दोघेही कोणत्याही थराला जातील. हा सर्व निवडणुकांचा खेळ आपण डोळसपणे बघितला तर आपण योग्य निर्णय घेऊ शकतो. पण जर या खेळाचा अभ्यास न करता आपण भावनिक वादळात अडकलो तर आपण थेट त्यांच्या जाळ्यात अडकून जाऊ. राममंदिर होणार या घोषणेने हुरळून जाण्याचे कारण नाही आणि दलितांवरील अत्याचार वाढलेत या वाक्याने माथी भडकवून घेण्यात अर्थ नाही. निवडणुकीच्या काळातील प्रत्येक घोषणेचा अभ्यास करूनच प्रतिक्रिया द्यायला हवी. नाहीतर नेहमीप्रमाणे आपला फक्त वापर होईल आणि आपल्याच जीवाशी खेळ होईल.

महाराष्ट्रातही विधानसभा निवडणुकीच्या आधीचे हे वर्ष आहे. त्यामुळे घोषणा आणि उद्‌घाटनांचा सुळसुळाट होईल. निवडणुकीनंतर एकत्र येणारे शिवसेना आणि भाजपा यावर्षी पराकोटीचे दुश्मन असल्याचे नाटक करीत एकमेकांवर तुटून पडतील. तीन वर्षे झोपलेल्या मनसेने मराठी भाषा, टोलनाके, भूमीपुत्र हे नेहमीचे विषय घेऊन हालचाल सुरू केलीच आहे. सिंचन घोटाळ्यात बुडल्याने बंद पडलेल्या राष्ट्रवादीच्या घड्याळाला शहरात आसरा नसल्याने मतांसाठी ग्रामीण भागाकडे वळावे लागले आहे. गावाकडच्या समस्यांसाठी आंदोलनांचा देखावा करण्यापलीकडे ते दुसरे काही करूनच शकत नाहीत. काँग्रेसवाल्यांचा कंठ परप्रांतीयांसाठी दाटून येईल आणि यंदा छटपूजा अधिक जोमात होईल. जनतेच्या भावनेला हात घालण्याचे सर्व कार्यक्रम नवीन वर्षात वाजतगाजत सुरू होणार आहेत. कोणता ढोल कोण पिटतो आहे आणि कशासाठी पिटतो आहे हे सतर्कपणे जाणून घेतले तर आपण शांत राहू आणि शांत डोक्याने मतदान करू. सत्तेत असणाऱ्याच्या निर्णयांचा आपल्या रोजच्या जीवनावर परिणाम होतो. त्यामुळे राजकारणापासून दूर न पळता राजकारण समजून घेऊन योग्य उमेदवार निवडीचा नववर्ष संकल्प आपण सर्वांनी करूया.